REGISTERED No. B3454.




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ | पुणें, बुधवार तारीख ९ जुलै १९४७ | अंक २८






दि मोटार ओनर्स म्युच्युअल
इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७५ सदाशिव, लक्ष्मीरोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.–

ब्रँच सेक्रेटरी

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें-आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
दमडेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**मद्रासमधील मोटार वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**—मद्रास प्रांतांतील मोटारच्या वहातुकीचें राष्ट्रीयीकरण करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठीं वहातुकमंत्र्यांच्या अध्यक्षत्वाखाली एक ट्रॅन्सपोर्ट बोर्ड लवकरच स्थापण्यांत येणार आहे. प्रारंभीं मद्रास शहरांतील बस वहातुक सरकार ताब्यांत घेणार असून नंतर मालाच्या लॉऱ्या आणि टॅक्सी ह्याहि ताब्यांत घेण्याचा सरकारचा विचार आहे. पुढील पायरी म्हणून मद्रास प्रांतांतील मोठीं शहरें आणि मुख्य रस्ते ह्यांतील वहातुक सरकारी मालकीची करण्यांत येईल, असें समजतें.

**मद्रासचा वीज पुरवठा**—ऑगस्टच्या २९ तारखेपासून मद्रास इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशन मद्रास सरकारनें आपल्या हुकमतीखाली घेण्याचें ठरविलें आहे.

**अमेरिकेंत गव्हाचें भरपूर पीक**—आतापर्यंत कधीहि पिकला नव्हता एवढा गहूं अमेरिकेंत १९४७ सालीं पिकेल, असा अंदाज तेथील सरकारच्या शेतकी खात्यानें केला आहे. अंदाजाप्रमाणें पीक हातीं लागलें, तर अन्नधान्याची टंचाई असलेल्या देशांना अमेरिका एक वर्षभर गहूं पुरवूं शकेल. परंतु, गव्हाच्या वहातुकीसाठी रेल्वे वॅगन्स आणि बोटी मिळविण्यासंबंधी मात्र अडचणीची परिस्थिती उत्पन्न होण्याचा संभव आहे.

**हिंदुस्थानसाठी अमेरिकन धान्य**—अमेरिकेच्या शेतकी खात्यानें हिंदुस्थानला यावयाच्या अन्नधान्यांत अधिक भर घालण्याचें जाहीर केलें आहे. जुलै महिन्यासाठी हिंदुस्थानला देण्यांत येणाऱ्या अन्नधान्याशिवाय १२ हजार टन आटा, ८½ हजार टन गहूं आणि १७ हजार टन इतर धान्य देण्यांत येणार आहे.

**जपानमधून घड्याळें येणार**—जपानला परराष्ट्राशीं व्यापार करण्याची तूर्त परवानगी नाहीं. परंतु ती मिळताक्षणीं, जपानमधून खूप मोठ्या प्रमाणावर लहान-मोठी घड्याळें निर्यात करण्यांत येतील असें समजतें.

**अणुशक्तीसंबंधीं रशिआची नवी योजना**— अणुशक्तीवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण ठेवण्यासाठी रशिआनें एक नवीन योजना सुचविली आहे. ह्या योजनेंत, ॲटम बॉम्ब आणि मोठ्या प्रमाणावर नाश करणारीं इतर साधनें ह्यांचा युद्धांत उपयोग करूं नये असें सुचविणारें कलम पूर्वीच्या योजनेंप्रमाणेंच कायम आहे.

**चितगांव मोठें बंदर होणार**—चितगांवचें सध्याचें बंदर मोठें करण्यासाठी बंगाल सरकारनें एक योजना आखली असल्याचें समजतें. चितगांवच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या आसमंतांतील २० मैलांच्या परिघांतील जमीन सरकार घेणार असल्याची द्वाही फिरविण्यांत आली असून ह्या जागेची पाहाणी करण्यासाठी अधिकारीहि नेमण्यांत आले आहेत.

**सर सी. व्ही. रामन ह्यांचा सन्मान**—सोव्हिएट रशिआच्या ॲकॅडेमी ऑफ सायन्स ह्या संस्थेनें सर सी. व्ही. रामन ह्यांना आपलें सभासद करून घेतलें आहे. सर रामन ह्यांनीं प्रकाशकिरणांच्या वक्रीभवनाबद्दल केलेल्या संशोधनाचा उल्लेख सभासदत्व जाहीर करतांना मॉस्को रेडिओवर करण्यांत आला.

**प्रे. ट्रुमन ह्यांचा विरोध धुडकावला**—कामगार-संघटनांच्या स्वातंत्र्याला पायबंद घालणारें बिल प्रे. ट्रुमन ह्यांनीं आपल्या अधिकारांत फेटाळून लावलें होतें. परंतु अमेरिकेच्या सिनेट सभेनें प्रे. ट्रुमन यांच्या विरोधास न जुमानता बिल मंजूर केलें आहे.


**दि बँक ऑफ कराड, लि.**

कराड ( जि. सातारा )

( स्थापना : १२-३-१९४६ )

**पहिल्या नऊ महिन्यांतील प्रगति**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल .... | ५,००,००० रु. |
| विक्रीस काढलेलें व | |
| खपलेलें भांडवल ... | २,५०,००० रु. |
| वसूल केलेलें भांडवल.... | १,२५,००० रु. |
| ठेवी .... | १०,८०,००० रु. |
| एकूण खेळतें भांडवल.... | १२,२२,००० रु. |

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

म. वि. खंडकर
मॅनेजर

**रामतीर्थ ब्राह्मी तेल**



[ स्पेशल नं. १ ]
सर्वत्र मिळतो.
पांढरे केस काळे होतात. स्मरणशक्ति वाढते. टकलावर केंस उगवतात. शांत झोंप येते. दृष्टि सुधारते. केंस लांबसडक होतात. केंसांची नीट निगा राखते. डोकेंदुखी थांबते.

मोठी बाटली रु. ३-८-०, लहान बाटली रु. २-०-०
रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्डहर्स्ट रोड, मुंबई ४






# अर्थ

बुधवार, ता. ९ जुलै, १९४७





प्रो. वा. गो .काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. स. संह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## नियंत्रणाची उभी इमारत बळकट करा

### हिंदुस्थानांतील गंभीर आर्थिक परिस्थितीवर उपाय योजना

फेब्रुवारी, १९४७ मध्यें हिंदुस्थान सरकारनें मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या नियंत्रणाखालील जिनसांच्या किंमतींत प्रमाणबद्धता आणण्याचे दृष्टीनें तज्ञांचा सल्ला मिळविण्यासाठी " कमॉडिटीज प्राइसेस बोर्ड" स्थापन केलें. कपाशी सारखी पैसा निर्माण करणारीं व गहू किंवा तांदूळ ह्यांच्या सारखी धान्याचीं पिकें ह्यांच्या किंमतींत प्रमाणबद्धता हवी, त्याप्रमाणेंच शेतीचें उत्पादन आणि औद्योगिक उत्पादन ह्यांस येणाऱ्या किंमतींतहि गैरवाजवी विषमता उपयोगी नाहीं. किंमतींचें नियंत्रण करतांना त्या त्या प्रसंगीं विशिष्ट बाबी पुरताच विचार केला जातो; परंतु नागरिकांचें आर्थिक जीवन अनेक बाबींच्या सामुदायिक संघर्षावर अवलंबून असतें आणि जीवनास आवश्यक अशा सर्वच गोष्टींचा एकसूत्रीपणानें विचार करण्यांत आला नाहीं तर फुटकळ नियंत्रणाचे सुपरिणाम होण्यापेक्षा दुष्परिणामच अधिक होण्याचा धोका असतो. " कमॉडिटीज प्राइसेस बोर्डा" नें हिंदुस्थान सरकारास ह्यासंबंधांतील आपला अभिप्राय नुकताच सादर केला आहे. बोर्डाचे अध्यक्ष मि. ए. डी. गोरेवाला. आय. सी. एस. व सभासद प्रि. धनंजयराव गाडगीळ ह्या दोघांचीहि धान्य आणि इतर जीवनावश्यक जिनसांच्या पुरवठ्याबाबत अनुभव आणि कामगिरी हीं प्रसिद्धच आहेत. प्रि. गाडगीळ ह्यांनीं धान्य वाटपाचे अगदीं प्रारंभींचे दिवसांत, तेव्हांच्या लोकमतास विरोध करूनहि सक्तीच्या लेव्हीची योजना पुरस्कारली होती आणि धान्य वाटपाच्या पद्धतीस पाठिंबा दिला होता, ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. त्यांच्या दूरदर्शीपणामुळेंच मुंबई प्रांतांतील धान्याचा कारभार इतका यशस्वी होऊं शकला, हें कित्येकांस माहीत नसेल. त्यांच्या विचारांची छाप क. ॲ. बोर्डाच्या रिपोर्टावर पडणें अपरिहार्यच आहे.

हिंदुस्थानांतील शेतीचें एकूण क्षेत्र येत्या दोनचार वर्षांत फारसें वाढणार नाहीं, किंवा दर एकरी उत्पादनहि विशेष सुधारणार नाहीं, हें कटु सत्य आहे. औद्योगिक उत्पादन युद्धापूर्वीच्या सरासरी उत्पादनाचेहि खालीं जाऊन ठेपलें आहे आणि तें वाढण्याच्या मार्गांत अनेक अडथळे आहेत. बाहेरून यंत्रसामुग्रीची मोठ्या प्रमाणावर आयात झाली, कोळशाचा पुरवठा वाढला, कामगारांचें घातुक धोरण बदललें तरच कापड किंवा इतर जिनसा ज्यास्त प्रमाणांत निघूं शकतील. धान्याप्रमाणेंच कापड, साखर, गूळ, तेलें, पेंड, सरपण, कोळसा, लोखंड, पोलाद, सिमेंट, ताग, गळिताचीं धान्यें इत्यादींच्या उत्पादनाची व पुरवठ्याची कहाणी आहे, आणि मागणी पुरी पडण्याचा कांहीं काळ तरी संभव दिसत नाहीं. ह्या सर्वांचेवर नियंत्रण ठेवल्याखेरीज गत्यंतरच नाहीं. आजहि त्यांपैकीं बहुतेक प्रत्येकावर कडक नियंत्रण आहे, तें ज्यास्त कसोशीनें अंमलांत आणणें आवश्यक आहे. पुरवठा जोपर्यंत असमाधानकारक आहे, तोपर्यंत रेशनिंग चालू ठेवणें क्रमप्राप्तच आहे आणि त्यासाठी किंमतींचें नियंत्रण अपरिहार्य ठरतें. किंमतींचें नियंत्रण व रेशनिंग ह्यांचे बाबत हितसंबंधी लोकांकडून कित्येक प्रसंगीं दिशाभूल करणारा प्रचार केला जातो आणि व्यापाऱ्यांच्या मागोमाग अज्ञ गिऱ्हाईकहि कंट्रोल उठविण्याचें अगत्य प्रतिपादतांना आढळतात. नियंत्रणें उठवलीं तर किंमती भडकतील व गरिबांस जिनसा मिळणें अशक्यप्राय होईल असा इषारा क. प्रा. बोर्डानें स्पष्ट दिला आहे. नियंत्रित माल ठराविक किंमतीस सर्वत्र न्याय्य प्रमाणांत मिळण्याची चोख व्यवस्था झाल्याविना नियंत्रणाचें धोरण लोकहितास पोषक होणार नाहीं, ही गोष्टहि अत्यंत महत्त्वाची आहे. त्यासाठी जनतेनें जागरूकपणा दाखविला पाहिजे आणि काळ्या बाजारास आळा घालण्याचे कामीं सरकारला मदत केली पाहिजे.

नियंत्रणाचें धोरण ही एक नैमित्तिक, अपरिहार्य, नाइलाजाची बाब आहे आणि शक्य तितक्या लवकर हें धोरण सोडून देणें युक्त आहे, असा समज माहितगार अधिकारी आणि जबाबदार पुढारी ह्यांनीं पसरविणें फारच घातुक ठरत आहे. नियंत्रणाचा भंग करणें किफायतशीर असल्यानें प्रत्येक जणच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या वाम मार्गाचा अवलंब करीत आहे. नियंत्रणाची अंमलबजावणी करणारे अधिकारी आपल्या कामांत इष्ट तेवढें लक्ष घालीत नाहींत आणि जबाबदार पुढारीहि नियंत्रणाचे बाबतींत विचारपूर्वक अभ्यास करीत नाहींत अशी परिस्थिति आहे. ह्या स्थितीचा गंभीरपणा क. ॲ. बोर्डानें सरकारच्या नजरेस स्पष्टपणें आणला आहे. हिंदी आर्थिक परिस्थिति अत्यंत भीषण आहे आणि ती सुधारण्यासाठी भगीरथ प्रयत्नांची आवश्यकता आहे; जनतेच्या सर्व घटकांनीं ह्या प्रयत्नांस हातभार लावला पाहिजे; ठराविक दिशेनें ठराविक मुदतींत प्रगतीचा नियोजित पल्ला गाठला पाहिजे; वगैरे बाबत लोकजागृति करण्याचें अगत्य बोर्डानें प्रतिपादन केलें आहे. अर्थात् सरकारनेंहि आपल्या निश्चित धोरणाची घोषणा केली पाहिजे आणि त्या धोरणास पोषक अशा रीतीनें आपल्या सर्व शक्ती एकवटल्या पाहिजेत, हेंहि बोर्डानें आपल्या रिपोर्टांत स्पष्ट केलें आहे. धरसोडपणाच्या वृत्तीचा बोर्डानें तीव्र शब्दांत निषेध केला आहे. नियंत्रणाची आज उभी असलेली इमारत ज्यास्त बळकट होण्याऐवजी ती ढिली झाली तर भयंकर आपत्ति ओढवेल, ही गोष्ट जनतेस पटवून देण्यांत आली पाहिजे. " नियोजन व नियंत्रण हीं आतां कायमचींच ठेवावीं लागणार; सर्वांगीण नियोजनाशिवाय ह्यापुढील हिंदुस्थानांतील आयुष्य समृद्ध व समाधानाचें होणार नाहीं, अशी खूणगाठ प्रत्येकानें आपल्या मनाशीं बांधली पाहिजे " ह्या प्रि. गाडगीळ ह्यांच्या उद्गारांकडे लक्ष वेधणें येथें योग्य आहे.

---

**इटलींत फॅसिस्ट संघटना**—रोम शहरांतील एक फॅसिस्ट अत्याचारी संघटनेचा छडा इटालिअन पोलिस खात्यानें लावला आहे. इटलींत अजूनही फॅसिस्टांच्या अगर त्यांना सहानुभूति दाखविणाऱ्या संस्था असाव्यात. असा संशय पोलिस खात्याला आला आहे.

## स्फुट विचार

### सहकारी गृहमंडळ्या

मुंबई सरकारचे अर्थमंत्री, श्री. वैकुंठराय मेहता, यांनीं अहमदाबादमध्यें स्थापन झालेल्या आर्यनगर कोऑपरेटिव्ह हौसिंग कॉलनीच्या उद्घाटनप्रसंगीं एक महत्त्वाचें भाषण केलें. सध्या मोठमोठ्या शहरांतून लक्षावधि कुटुंबें दाटीवाटीनें राहून काळ कंठीत आहेत. रहाण्याच्या जागेचा हा तुटवडा भरून काढण्याच्या दृष्टीनें सहकाराच्या तत्त्वावर जर गृहमंडळ्या स्थापन झाल्या तर सरकार काय स्वरूपाची मदत करील, ह्याचा खुलासा अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत केला हें चांगलें झालें. कारण, त्यांनींच म्हटल्याप्रमाणें अशा प्रकारच्या योजनांत सरकारनें कांहीं तरी हालचाल केल्याशिवाय सहकारी मंडळ्यांना लागणारा जरूर तो पैसा उभारणें कठीण जातें. तथापि, केवळ सरकारी मदतीची अपेक्षा करून स्वस्थ बसणें योग्य होणार नाहीं. अहमदाबादच्या ज्या संस्थेचें अर्थमंत्र्यांनीं उद्घाटन केलें, तिच्या चालकांनीं अशी वाट न पहातां संस्था उभारली याबद्दल त्यांनीं अभिनंदनपर उद्गार काढले त्याला या दृष्टीनें महत्त्व आहे. मुंबई प्रांतांतील सहकारी गृहमंडळ्यांची एकंदर संख्या १३५ असून त्यांपैकी केवळ सहाच शारीरिक श्रम करणाऱ्या लोकांसाठी काढण्यांत आलेल्या आहेत अशी माहिती अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत सांगितली. या बाबीसंबंधीं अधिक विचार आणि उपाययोजना होणें आवश्यक आहे यांत शंका नाहीं. अशा प्रकारच्या सहकारी गृहमंडळ्या स्थापन करण्याच्या कामीं मुंबई सरकार जागा मिळवून देणें, पैसे उभारण्यास मदत करणें, जरूर तर सरकारमान्य योजनेनुसार प्रत्यक्ष पैशाची मदत करणें इत्यादि गोष्टी करण्यास तयार असल्याचें त्यांनीं सांगितलें. मजुरांच्या सुखसोयीबद्दल आस्था असणारांनीं पुढाकार घेऊन सहकारी गृहमंडळ्या स्थापन कराव्या अशी विनंतीहि त्यांनीं केली. त्या विनंतीशीं सहकार्य करून सामाजिक कार्यकर्त्यांनीं सहकारी गृहमंडळ्या काढल्या तर मुंबई प्रांतांतील रहाण्याच्या जागेचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटण्याच्या मार्गास लागेल असें वाटतें.

### अमेरिकेंतील हिंदी पुरवठा–मंडळ

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या सरकारांना लागणाऱ्या हरतऱ्हेच्या मालाचा पुरवठा अमेरिकेंतून करण्यासाठी हिंदी पुरवठा–मंडळ नांवाची एक संस्था मध्यवर्ती सरकारनें स्थापन केली आहे. गेलीं सहा वर्षें या संस्थेनें काय काम केलें यासंबंधींचें एक माहिती-पत्रक मध्यवर्ती सरकारकडून प्रांतिक सरकारांकडे पाठविण्यांत आलें आहे. वरील कालावधींत पुरवठा–मंडळानें, चांदी आणि कांहीं प्रकारची लष्करी सामुग्री सोडून सुमारें ५० कोटी डॉलर्सचा माल पुरवला. या व्यवहारापैकीं सरासरी ५० टक्के व्यवहार रोखीनें करण्यांत आला आणि बाकीचा उधार-उसनवारीनें करण्यांत आला. या संस्थेची अमेरिकन बाजारांत चांगली पत असून अमेरिकन उद्योगधंदेवाल्यांनीं संस्थेला रोखीचे बाबतींत सवलतीहि दिलेल्या आहेत. संस्थेतर्फे कांहीं माल घेतला तर त्याचे पैसे प्रत्यक्ष मालकी, विकत घेणाऱ्याकडे गेल्यावर दिले तरी चालतात. याला अपवाद फार मोठ्या पुरवठ्याबद्दलच्या करारांचा तेवढा आहे. अशा करारांच्या बाबतींत मात्र कांहीं पैसे आगाऊ द्यावे लागतात. पुरवठा मंडळानें उत्तर अमेरिकेंतील उद्योगधंद्यांबद्दल चांगली माहिती व अनुभव मिळविला आहे. मंडळातर्फे अन्नधान्यापासून तों मोठमोठ्या कारखान्यांना लागणाऱ्या प्रचंड यंत्रसामुग्रीपर्यंत सर्व प्रकारचा माल आतांपर्यंत पुरवण्यांत आलेला आहे. मंडळातर्फे मिळविण्यांत आलेल्या मालाची बंदरापर्यंतची व नंतरची बोटींची वहातुक करण्याची जबाबदारीही मंडळच पत्करतें. सध्या चालू असलेला बोटींचा तुटवडा आणि संप यामुळें या बाबीला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. मंडळाचा मूळ उद्देश हिंदुस्थानांतील सरकारांना माल पुरवण्याचा असला तरी हिंदी उद्योगपतींना हिंदुस्थान सरकारकडे अर्ज करून या मंडळाचा फायदा घेतां येईल. विशेषतः हिंदी यंत्रविशारदांना उच्च शिक्षणासाठी अमेरिकेंत पाठविण्यास या संस्थेची चांगली मदत होऊं शकेल.

### शेअर बाजार आणि कंपन्यांच्या डिव्हिडंडचा गौप्य स्फोट

शेअर बाजारांतील खरेदी–विक्रीच्या व्यवहारासंबंधी, मुंबईच्या स्टॉक एक्सचेंजचे अध्यक्ष श्री. श्रॉफ यांनीं नुकतेच कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. शेअर बाजारांतील व्यवहारांना सट्टेबाजीचें जें स्वरूप कधीं कधीं प्राप्त होतें त्याला कारण कंपन्यांचे चालक आणि स्टॉक एक्सचेंजचे अधिकारी यांच्यांत पुरेसें सहकार्य नसतें, असें सांगण्यांत येतें. श्री. श्रॉफ यांनीं संबंधी दोन कंपन्यांचीं नांवें देऊन, शेअर बाजारांत असलेल्या कंपन्यांच्या कडून महत्त्वाची माहिती आधीच बाहेर फुटते व त्यामुळें शेअर बाजारांत गुप्त बातम्यांच्या जोरावर सट्टेबाजीची खरेदी–विक्री होते अशी तक्रार केली आहे. श्री. श्रॉफ म्हणतात, "बॉंबे डाइंग या कंपनीनें बोनस–भाग भागीदारांना देण्याचा निर्णय १९४६ च्या नाताळांत घेतला. वास्तविक ही माहिती मुद्दाम मनुष्य पाठवून स्टॉक एक्सचेंजला कळविण्यास पाहिजे होती. पण असें न करतां त्यासंबंधींचें पत्र ता. २४ डिसेंबरला स्टॉक एक्सचेंज बंद होण्याच्या सुमाराला, सेक्रेटरी कचेरींतून निघून गेल्यावर, धाडण्यांत आलें. त्यानंतर दोन दिवस बँकांना सुट्ट्या होत्या. सुट्टी संपल्यानंतर ता. २७ डिसेंबरला पत्र हातीं आल्याबरोबर बोनससंबंधीं नोटीस बोर्डावर लावण्यांत आली. अशाच प्रकारचें ताजें उदाहरण सिंप्लेक्स मिल्सचें आहे. या कंपनीतर्फे जाहीर करण्यांत आलेल्या नफा–वाटणीसंबंधींचें पत्र ता. २८ मे, १९४७ रोजीं स्टॉक एक्सचेंजकडे धाडण्यांत आलें. तें तावडतोब नोटीस बोर्डावर लावण्यांत आलें. पण त्याच तारखेचें बोनस–भागासंबंधींचें पत्र मात्र त्या दिवशीं संध्याकाळीं जनरल पोस्ट ऑफिसांत टाकण्यांत आलें. तें दुसऱ्या दिवशीं स्टॉक एक्सचेंजला मिळालें. या दोन कंपन्यांचीं मीं नांवें सांगितलीं इतकेंच. पण इतर ज्या कांहीं कंपन्यांनीं बोनस भाग काढले त्यांच्याहि बाबतींत असेंच झालेलें आहे. बोनस भागाची अधिकृत माहिती जाहीर होण्यापूर्वीच ती कांहीं लोकांना आधीं कळलेली असते. अशा परिस्थितींत गुप्त माहितीचा गैरफायदा घेतला गेला तर त्यासंबंधीं स्टॉक एक्सचेंजला जबाबदार धरतां येणार नाहीं. म्हणून कंपन्यांच्या चालकांना माझें असें सांगणें आहे कीं त्यांनीं आपआपली माहिती स्टॉक एक्सचेंजला तावडतोब कळवावी; म्हणजे कंपनीचे भागीदार आणि पैशाची गुंतवणूक करणारे प्रामाणिक लोक या दोघांचेहि हितसंबंध सुरक्षित रहातील." श्री. श्रॉफ यांनीं या प्रकारासंबंधीं मि. एच्. स्टॅसी या तज्ज्ञाचा अभिप्राय मुद्दाम उद्धृत केला आहे.तो असा: जो सट्टेबाज गुप्त माहितीच्या जोरावर व्यवहार करतो त्याच्याकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं, कारण असा सट्टेबाज आपल्याबरोबरच्या भागीदारांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत असतो. सामान्य चोरी ह्यापेक्षा आणखी वेगळी तीं काय असेल?

## धंद्याच्या व्यवस्थापकाच्या शिक्षणाची आवश्यकता

लेखकः श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी.

हिंदुस्थानला,देशाची फाळणी होऊन कां होईना, संपूर्ण स्वातंत्र्य लौकरच मिळणार आहे व ह्या दृष्टीनें हिंदी जनतेला निरनिराळया जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणार आहेत. हिंदुस्थानचें औद्योगीकरण फार मोठ्या प्रमाणांत होणें इष्ट आहे व त्यासाठी निरनिराळ्या लहान मोठ्या धंद्यांच्या व्यवस्थेचीं सूत्रें कार्यक्षमतेनें स्वीकारणारा वर्ग अस्तित्वांत येणें आवश्यक आहे. सध्यां हिंदुस्थानांत उद्योगधंद्यांत कांहीं प्रमुख सूत्रधार चटकन मनांत भरतात, परंतु देशाच्या आजच्या व भावी उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें आपल्या कार्यांत चोकखार असा व्यवस्थापकांचा वर्ग फारसा आढळत नाहीं. शेत करणारा, मजूर, कारकून, शिक्षक, वैद्य, डॉक्टर इ. व्यवसायांत काम करणारीं माणसें सहज मिळू शकतात. परंतु धंद्याच्या बाबतींत कार्यक्षम व्यवस्थापक सहज रीतीनें मिळूं शकत नाहींत.

ब्रिटिश अमदानींत उद्योगधंद्यांच्या दुःस्थितीला आपण सहज रीतीनें सरकारला जबाबदार समजत आलों आहोंत. आतां ह्यापुढें हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या स्वतंत्र होणार आहे. तेव्हां आतांपर्यंतचीं कारणें यापुढें नष्ट होतील व त्यामुळें स्वतंत्र हिंदुस्थानची औद्योगिक प्रगति होणें शक्य होईल. औद्योगिक प्रगति होतांना, धंद्यांची व्यवस्था ठेवणारा व्यवस्थापक वर्ग निर्माण करण्याकडे हिंदी कारखानदारांनी, धंदेवाइकांनी व सरकारनें लक्ष दिलें पाहिजे.

ब्रिटिश अमदानींत शैक्षणिक प्रगति बहुतेक पुस्तकी ज्ञानाच्या दृष्टीनें झाली. सरकारने किंवा विद्यापीठांनी विविध बाजूंचें शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली नाहीं. मुंबई-सारख्या औद्योगिक बाबतींत पुढें असलेल्या प्रांतांत केवळ तीस वर्षांपूर्वी पहिलें व्यापारी कॉलेज स्थापन झालें. उद्योगधंद्यांत कोणीहि पडावें, त्यासाठीं कांहीं विशेष प्रकारचें शिक्षण घ्यावें लागतें असें नाहीं, अशी आपल्याकडे प्रवृत्ति आहे. पुष्कळच वेळां केवळ वारसहक्कामुळें धंद्यांच्या व्यवस्थापकांचीं सूत्रें हातीं येतात. अशा वेळीं लायकी किंवा अंगभूत गुण फारसे विचारांत घेतले जात नाहींत. मोठमोठ्या उद्योगधंद्यांत तर आपल्याकडे 'मॅनेजिंग एजन्सी' ची पद्धति रूढ आहे. यामुळें कांहीं ठराविक श्रीमंत लोकांकडेच धंद्यांच्या व्यवस्थापकत्वाची जबाबदारी येते. हे व्यवस्थापक ह्या कार्यासाठी शैक्षणिक दृष्ट्या नेहमींच लायक असतात असें नाहीं.

व्यवस्थापकांच्या कामाबद्दल व लायकीबद्दल कोणी फारसा विचार करीत नाहीं ह्याचीं आणखी उदाहरणें पहा. कोंकणांत कलमी आंब्यांचा व्यापार गेलीं ६०।७० वर्षें केला जातो. परंतु ह्या धंद्यांत असलेल्या लोकांनीं धंद्याची विशेष तऱ्हेनें माहिती मिळवलेली असते असें नाहीं. बहुतेकांना मुंबईंत दलालांमार्फत कसा व्यापार चालतो व मालाची विक्री कशी केली जाते याची कल्पना नसते. बहुतेकांना दलाल देतील त्या दरावर अवलंबून रहावें लागतें व त्यामुळें पुष्कळ वेळां हातांत फारच कमी पैसा येतो. मच्छीमारीचा धंदा तर हल्लींच्या युगाला साजेशी व्यवस्थापकाची दृष्टि नसल्यामुळें मागासलेला राहिला आहे. तीच गोष्ट कातडी कमावण्याच्या धंद्याची होती. मोठ्या प्रमाणांत भाजीपाला करणारे बागाईतदार, दुधदुभत्याचा धंदा करणारे लोक, हॉटेलवाले, भाताच्या गिरण्या चालविणारे इ. अनेक धंद्यांत व्यवस्थापकाच्या लायकीचा शास्त्रशुद्ध विचार केला जात नाहीं. कोणीहि, कोठेंहि व कसाहि धंदा करावा अशीच सर्वसाधारण प्रवृत्ति आहे. साजभी रीत्या दुय्यम शाळा चालविल्या जातात, तेथेंहि कांहीं अपवाद सोडल्यास, व्यवस्थापक वर्गामध्यें योग्य दृष्टि किंवा धोरण किंवा बुद्धीचा व्यापकपणा दिसून येत नाहीं.

हिंदुस्थानांत कांहीं विशिष्ट जातींत धंद्याला आवश्यक अशा व्यवस्थापक—वृत्तीची जोपसना झाली आहे. परंतु यांच्याहि बाबतींत व्यापक शास्त्रशुद्ध शिक्षणाचा बरेच वेळा अभाव दिसतो. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका इ. देशांत व्यवस्थापक—वृत्ति अनेक अनुकूल कारणांमुळें वृद्धिंगत पावली. राजकीय दृष्ट्या स्वतंत्र होणाऱ्या हिंदुस्थाननें यापुढें कार्यक्षम व्यवस्थापक वर्ग निर्माण केला पाहिजे. यासाठीं शिक्षणपद्धतींत सुधारणा केली पाहिजे. मोठमोठ्या उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापकांना मिळणारें शिक्षण व्यापक, शास्त्रीय व निश्चित असें असलें पाहिजे. अशा शिक्षणामध्यें कमींत कमी पुढील गोष्टींचा समावेश झाला पाहिजेः—आधुनिक अर्थशास्त्र; हिंदी आर्थिक प्रश्नांचें ज्ञान; भांडवलशाहीवरील मुख्य आक्षेप; मजुरांचे प्रश्न व ते कसे सोडवावे, व मजुरांचे बाबतींत सरकारी कायदे व आंतरराष्ट्रीय सर्वमान्य तत्त्वें; जगांतील उद्योगप्रधान राष्ट्रांच्या प्रगतीचा इतिहास; देशांतील कर—पद्धति; विमा व त्याबद्दलची निरनिराळ्या प्रकारची व्यवस्था. याव्यतिरिक्त त्या त्या उद्योगधंद्यांची विशिष्ट माहिती, व्यवहारतत्परता व धंद्यांतील प्रत्यक्ष अनुभव. अशा प्रकारचा व्यवस्थापक वर्ग तयार होण्यावर हिंदी उद्योगधंद्यांचें यश अवलंबून आहे.

---

**बिहारमध्यें कोंबड्यांची पैदास**—बिहार सरकारनें कोंबड्यांचा धंदा प्रांतांत पसरविण्याच्या दृष्टीनें एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. ह्या पंचवार्षिक कार्यक्रमाला ५ लक्ष रुपये खर्च येणार असून उत्तम जातीच्या कोंबड्या पैदास करून त्या ह्या धंद्यांतील लोकांना पुरविण्यांत येणार आहेत.

**जपान तहपरिषदेला पं. नेहरूंना बोलावणें**—ऑगस्टमध्यें ऑस्ट्रेलिआंतील कॅनबेरा येथें जपानशी करावयाच्या तहाची चर्चा करण्यासाठी ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांची परिषद भरणार आहे. ह्या परिषदेस हजर रहाण्यासाठी पं. नेहरू आणि बॅ. जिना ह्यांना हजर रहाण्याची विनंति करण्यांत येईल असें समजतें.

**गिलगिट काश्मीरला परत मिळणार**—काश्मीर संस्थानांतील गिलगिट व आसपासचा कांहीं प्रदेश ब्रिटिश सरकारास भाडेपट्टयानें दिलेला होता. काश्मीर स्वतंत्र होण्याच्या संभवाबरोबर हा भाग संस्थानला परत मिळणार अशी बोलवा आहे. गिलगिट रशिआच्या सरहद्दीजवळ असून लष्करी दृष्ट्या महत्त्वाचा आहे.

**कंपनी कायद्यांत दुरुस्ती**—मुंबई शेअर–होल्डर्स असोसिएशनच्या कमिटीची सभा भरून, कंपनी कायद्यांत दुरुस्त्या सुचविण्यासाठी सरकारनें नेमलेल्या तज्ञाचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत यावा अशी तींत मागणी करण्यांत आली. या कायद्यांत किरकोळ दुरुस्त्या करण्यापेक्षां सर्वच कायदा सरकारनें लक्ष घालून अद्यावत् करावा, असें मत कमिटीनें व्यक्त केलें आहे.

**नवीन महाराष्ट्रीय रजिस्टर्ड अकौंटंट्स**—१९४७ सालीं मार्चमध्यें झालेल्या रजिस्टर्ड अकौंटंट्सच्या परीक्षेंत पुढील महाराष्ट्रीय उमेदवार यशस्वी झाले.

(१) श्री. पुरुषोत्तम आर. जोगळेकर, (२) श्री. बाळ एन्. नारळकर आणि (३) श्री. बाळकृष्ण आर. प्रभु.

**रोख्याच्या बक्षिसांचा निकाल**—हिंदुस्थान सरकारनें काढलेल्या १९४९ च्या पांच वर्षे मुदतीच्या बिनव्याजी बक्षिसांच्या रोख्यांच्या बक्षिसांचा निकाल ता. १५ जुलै, १९४७ रोजीं सकाळीं ११ वाजता मुंबई येथें सर कॉवसजी जहांगीर हॉलमध्यें चिठ्या टाकून जाहीर करण्यांत येणार आहे.

# सावकारी नियंत्रण कायदा व ठेवी

सावकारी धंद्याचें नियंत्रण करण्यासाठी मुंबई विधिमंडळानें संमत केलेल्या बॉम्बे मनिलेन्डर्स ॲक्ट १९४६, ह्या कायद्यास दिनांक २७ मे, १९४७ रोजीं गव्हर्नर जनरलची मंजुरी मिळाली व लोकांच्या माहितीसाठी तो कायदा ३१ मे, १९४७ च्या मुंबई गॅझेटमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलेला आहे. पुष्कळ लोकांचा असा समज झालेला आहे कीं, २७ मे १९४७ पासून सदरचा कायदा अंमलांत आला. कित्येक ठेवीदारांनीं ह्याबाबत आमचेकडे विचारणा केली आहे. वास्तविक हा कायदा कोणत्या तारखेपासून अंमलांत यावयाचा तें सरकारी गॅझेटमध्यें आगाऊ प्रसिद्ध करण्यांत यावयाचें आहे. अशी तारीख प्रसिद्ध झालेली नाहीं व उजाडली नाहीं तोंपर्यंत हा कायदा अंमलांत येणार नाहीं.

ह्या सावकारी नियंत्रणाच्या कायद्यामुळें ठेवी ठेवण्यावर व स्वीकारण्यावर काय परिणाम घडतील त्याचीहि कित्येकांना नीटशी कल्पना नाहीं व त्यामुळें अनेक गैरसमज प्रसृत झालेले आहेत. यासाठी ह्या प्रश्नाचा विचार येथें केला आहे.

सावकारी नियंत्रण कायद्याच्या २ ( ९ ) या कलमामध्यें कर्ज ( लोन ) ह्या शब्दाची व्याख्या दिली आहे. त्या व्याख्येनुसार पैशाच्या अथवा सामानाच्या रूपानें एकाद्यास त्याच्या परतीवर पुढें परत मिळावा असा उद्देश ठेवून आगाऊ दिलेल्या कोणत्याहि भरण्याचा समावेश "कर्ज" या संज्ञेत होतो, व असें कर्ज देण्यावर ह्या कायद्याचीं बंधनें लागू होतात. परंतु त्यापुढें ह्याच व्याख्येला सहा अपवाद नमूद करण्यांत आले आहेत. त्यापैकीं पहिलाच अपवाद असा आहे कीं, पैसा अथवा इतर मालमत्ता पोस्ट ऑफिस बँक अगर इतर बँक ह्यामध्यें अथवा एकाद्या कंपनीकडे अगर सहकारी संस्थे (कोऑपरेटिव्ह सोसायटी) कडे ठेव म्हणून ठेवल्यास तिचा समावेश ' कर्ज ' या संज्ञेत होणार नाहीं. कंपनी व बँक ह्यांच्याहि व्याख्या कलम २ (१) व २ (४) ह्या कलमांत दिलेल्या आहेत. ' इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३' ह्या कायद्यांत दिलेल्या कंपनी व बँक, ह्या संज्ञांच्या व्याख्याच प्रस्तुत कायद्यासहि अभिमत असल्याचें ह्या ठिकाणीं नमूद करण्यांत आलें आहे. म्हणून कोणतीहि नोंदवलेली जाहीर ( पब्लिक ) अथवा खासगी ( प्रायव्हेट ) कंपनी ह्यांच्याकडे ठेवी ठेवण्यास परवाना ( लायसेन्स ) घेण्याचें कारण पडणार नाहीं. परंतु जे कारखाने अथवा व्यापारव्यवसाय कंपनी कायद्याखालीं नोंदवलेले नसतील; भागीदारी पेढी अथवा वैयक्तिक मालकीचा खासगी धंदा असे ज्या व्यवसायाचें स्वरूप असेल त्यांचेकडे मात्र, प्रस्तुत कायदा अंमलांत आल्यानंतर ठेवीदारांना परवाना घेतल्याशिवाय ठेव ठेवतां येणार नाहीं.

**तांदूळा बदली कापड**—हिंदुस्थान सरकारच्यातर्फे ब्रम्हदेश सरकारला २० लाख वार लुगींचें कापड पुरविण्याचें मद्रास सरकारनें कबूल केलें आहे. या कापडाच्या मोबदला ब्रम्हदेश मद्रासला तांदूळ पुरविणार आहे. कापडासाठी लागणारें सूत मुद्दाम पुरविण्यांत येणार असून त्यामुळें ३,४६० हातमाग कामगारांना रोजगार मिळेल.

**आस्ट्रेलिआंतून गहूं येणार**—हिंदुस्थानांतील अन्न धान्याची निकडीची गरज लक्षांत घेऊन आस्ट्रेलिअन सरकारनें १० लाख बुशेल गहूं आणि १,९०,००० बुशेल आटा देण्याचें कबूल केलें आहे. आस्ट्रेलियांतील धान्यपरिस्थिति जशी सुधारेल त्या मानानें अधिक धान्य हिंदुस्थानला देण्याचें आश्वासन ऑस्ट्रेलिअन सरकारनें दिलें आहे.

## चेक्सच्या कलेक्शनची प्रायोगिक व्यवस्था

पुण्यांत शेड्यूल्ड बँकांचें क्लिअरिंग हाउस ता. २८ मे रोजीं सुरू होणार होतें, परंतु एका मोठ्या बँकेनें त्याचें सभासदत्व पत्करण्याचें नाकारल्यामुळें तें सुरू होऊं शकलें नाहीं. पुणें शहरांतील बँकांनीं क्लिअरिंग हाउसची गरज अंशतः तरी भागविण्याच्या दृष्टीनें एक प्रायोगिक व्यवस्था सोमवार, ता. ७ जुलैपासून सुरू केली आहे. बँकांच्या शिपायांनीं दुसऱ्या सर्व बँकांकडे दररोज हेलपाटे घालण्यापेक्षा, बँकांच्या प्रतिनिधींनीं वसुलीसाठी आलेले चेक बरोबर नेऊन एकत्र जमावे आणि ते इतरांना द्यावेत. प्रत्येकानें दुसऱ्याकडून घेतलेले चेक स्वतःच्या बँकेंत घेऊन जावेत आणि त्यांच्या वसुलीच्या रकमेचा चेक घेऊन पुनः एके ठिकाणीं जमावें व तेथें एकमेकांच्या देण्याचे चेक देऊन टाकावे अशी ही योजना आहे. पुणें से. को. बँकेनें ह्या कामासाठी जागा दिली आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास त्यांतून बँकर्स क्लिअरिंग हाउसची योजना मूर्त स्वरूप धारण करूं शकेल अशी अपेक्षा आहे.

---

## रशियाच्या विरोधास न जुमानतां मार्शल योजनेचें गाडें ढकलणार

पॅरिस येथील तीन बड्या राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांची परिषद, ब्रिटिश सूचनांस रशियानें तीव्र विरोध केल्यामुळें, अयशस्वी झाली. मार्शल योजना इतक्या तडकाफडकी रशिया पूर्णपणें फेटाळून लावील, अशी अपेक्षा नव्हती. आतां, इंग्लंड व फ्रान्स, ह्यांनीं तात्काळ एक कमिटी नेमण्याची आपली सूचना पुढें मांडली असून युरोपांतील २२ राष्ट्रांचें त्यासाठी सहकार्य मागितलें आहे. युरोपच्या आर्थिक गरजा व पुरवठा ह्याविषयीं तपशील जमा करणें हा प्रस्तुत कमिटीचा तूर्त उद्देश आहे. ता. १२ जुलै रोजीं ह्या निमंत्रित राष्ट्रांची परिषद भरणार आहे तिला रशिया उपस्थित होण्याचा संभव दिसत नाहीं. पूर्व युरोपांतील रशियाच्या वर्चस्वाखालील किती राष्ट्रें परिषदेवर बहिष्कार घालतील हें आतां लवकरच दिसून येईल. मास्को येथें परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेंत जर्मनी व ऑस्ट्रिया ह्यांच्या प्रश्नावर जसें तडाष्टक निर्माण झालें होतें तसेंच पॅरिस येथील परिषदेंत मार्शल योजनेवर निर्माण झालें. तथापि, नोव्हेंबरमध्यें लंडन येथें परराष्ट्र मंत्र्यांची परिषद मॉस्को परिषदेंतील अपूर्ण वाटाघाटी पुढें चालू करणार आहे. त्यापूर्वीच पॅरिस येथें रशियाच्या विरोधास न जुमानता मॉर्शल योजनेचा विचार केला जाणार आहे. अशा रीतीनें, रशिया व इतर बडे दादा ह्यांच्यामधील मतभेदांस आतां उग्र स्वरूप प्राप्त होणार हें स्पष्ट दिसत आहे.

---

**सुरत शहरांत दुधाचें दुर्भिक्ष**—गेल्या कांहीं दिवसांपासून सुरत शहरांत दूध व दुधाच्या पदार्थांची फारच चणचण भासूं लागली आहे. दही तर अजिबात मिळेनासें झालें आहे. गेल्या वर्षापासून सुरत शहरांत दुधांत व तुपांत भेसळ करण्यांत आल्याचे प्रकारही वाढत आहेत. सुरत प्रमाणेंच बडोदा व भडोचमध्यें दूध दुर्मिळ झालें आहे.

**मुसलमान स्त्रियांनीं पडदा सोडला**—युगोस्लाव्हिआंतील मुसलमान स्त्रियांच्या एका संघटनेनें गोषा सोडून देण्याचें ठरविलें आहे. या संघटनेचे सभासद २३ हजारांवर आहेत.

**१२ हजार पौंड किंमतीचा हिरा**—किंबर्ले ( आफ्रिका ) येथील एका हिऱ्याच्या खाणींत ८६३ कॅरट वजनाचा हिरा नुकताच सांपडला. हा हिरा तावडतोब १२ हजार पौंडाला विकला गेला.

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
| --- | --- | --- | --- |
| पायोनिअर पाइप्स अँड एंजिनिअरिंग कं. लि., मुंबई | नळ, विटा, कौलें विकणें व तयार करणें | १०,००,००० | नवी कंपनी |
| थिरुमगल मिल्स लि., गुडीयाटम (उत्तर अर्काट) | सुताची गिरणी | ५,५१,००० | जु. कं. चे बोनस भाग |
| महिंद्र हारलँड लि., मुंबई | पाण्याचे पंप व विजेचें सामान | १५,००,००० | नवी कंपनी |
| ग्रामोफोन कं. ( इंडिआ ) लि., कलकत्ता | ग्रामोफोन व तत्संबंधी वस्तू | ७९,९०,००० | खाजगी कंपनीचें सार्वजनिक कंपनींत रूपांतर |
| ईस्ट काजोरा कोलिअरी कं. लि., कलकत्ता | कोळशाची खाण | १५,००,००० | नवी कंपनी |
| इंडिआ मशिनरी कं. लि., कलकत्ता | यांत्रिक अवजारें | २७,५०,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| जीना अँड कं. लि., मुंबई | आयात-निर्यात व्यापार, मक्ताशांचे एजंट | २५,००,००० | नवी कंपनी |
| सरोदा टी. कं. लि., जलपैगुरी | चहाचा मळा व विक्री | १२,००,००० | जु. कं. चे बोनस भाग |
| दिआवारी टी. कं. लि., जलपैगुरी | चहाचा मळा व विक्री | ५,९१,८५० | जु. कं. चे बोनस भाग |
| मॅचवेल इलेक्ट्रिकल ( इंडिआ ) लि., मुंबई | घरांत लागणारीं विजेचीं उपकरणें | २५,००,००० | नवी कंपनी |
| हर्षीय थिएटर्स लि., मुंबई | सिनेमा थिएटर्स उभारणें | २०,००,००० | नवी कंपनी |
| थिलाइनटराग बँक लि., कडलोर | बँक | ७,९१५ | जु. कं. चें नवीन भांडवल |
| बेंगाल नागपूर कॉटन मिल्स लि., कलकत्ता | कापड व सुताची गिरणी | १८,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |

**मद्रास प्रांतांतील कॉलेजांत फी वाढणार**—मद्रास सरकारनें सरकारी कॉलेजांतील फींत शेकडा २५ टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. सरकारी कॉलेजांप्रमाणेंच खाजगी कॉलेजांनींही आपल्या फींत वाढ करण्याचें ठरविलें असल्याचें समजतें.

**रुमेनिआला अमेरिकेची धमकी**—रुमेनिअन सरकारनें सध्या औद्योगिक धोरणाविषयक जे कायदे मंजूर केले आहेत, त्यामुळें अमेरिकन उद्योगधंद्यांना धंदा करणें अशक्य झाल्यास, अमेरिका तांतडीची उपाययोजना केल्याखेरीज रहाणार नाहीं, अशी समज अमेरिकन परराष्ट्र खात्यातर्फे रुमेनिअन सरकारला देण्यांत आली आहे.


गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

**दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.**

| | | | रुपये |
| --- | --- | --- | --- |
| आलेलें काम | : | : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : | : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : | : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

**विजय टेक्स्टाइल्स लि.**

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स.

डुप्लीकेटर्स घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र !

फक्त एका वर्षाच्या प्रिंटिंगच्या सर्चांत विकत मिळणारें, साधें व सुटसुटीत, हरकामी, लहानमोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमीं लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रीतीनें मिळतें. कॅश मेमोज, बिल फॉर्मस्, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हँडबिल्स, परीक्षेचे पेपर्स वगैरे सर्व प्रकारचीं व सर्व भाषेंतील प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात.

अधिक माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा.

कारखानदार:—

शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.

ठळकवाडी, बेळगांव

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ११ |

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : ७ सप्टेंबर, १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | : | २,००,००,००० रु. |
| वसूल झालेलें भांडवल | : | १,५०,००,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | : | २,००,००,००० रु |

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

—शाखा—

| | | |
|---|---|---|
| अहमदाबाद | काळबादेवी | कराची |
| भद्र (मुख्य ऑफिस) | मलबार हिल | मद्रास |
| एलिस ब्रिज | कलकत्ता | नागपूर |
| माणेक चौक | क्लाईव्ह स्ट्रीट | किंग्जवे |
| स्टेशन ब्रँच | (मुख्य ऑफिस) | इतवारी बझार |
| अमृतसर | बडा बझार | पुणें |
| अंधेरी (मुंबई शेजारीं) | चौरंगी स्क्वेअर | पुणें शहर |
| वांद्रे ( मुंबई शेजारीं ) | कालिकत | पालनपूर |
| भुज ( कच्छ ) | कोइमतूर | राजकोट |
| मुंबई | हैद्राबाद ( सिंध ) | सोलापूर |
| बुलियन एक्सचेंज | जमशेदपूर | सुरत |
| कुलाबा | जुनागड | वेरावळ |

लंडन शाखा : १७, मूर गेट, लंडन ई. सी. २

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

सर्व तन्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.
तपशीलासाठी चौकशी करा.

बी. एन. अटल,
एजंट, पुणें

ए. सी. क्लार्क,
जनरल मॅनेजर

## मजूरवर्गाचा वाढता बेजबाबदारपणा

लेः– श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्.

देशांतल्या मजूरवर्गाला आणि विशेषतः त्याच्या पुढाऱ्यांना दोन शब्द स्पष्टपणें सुनावण्याची वेळ आली आहे. मागच्या दोन वर्षांपासून संपाचें जणूं पेवच फुटलें आहे. नालायक मजुराला कामावरून काढलें, कर संप; कारखाना तोटयांत चालतो आहे म्हणून मजूर कमी केले, कर संप. महागाई वाढली आहे, हें मालकांना व सरकारला समजतें आहे. वाढते भत्ते दिले जात आहेत. तरी ऑलिव्हर ट्विस्टप्रमाणें आणखी भत्ते हवेत, म्हणून कर संप. एखाद्या कामचुकार मजुराला वरिष्ठ बोलला, कर संप; कंपनी गुडविलचे पैसे कामकऱ्यांना वांटण्यास तयार नाहीं अथवा आणखी बोनस देत नाहीं, तर कर संप. एक ना दोन. उठल्या सुटल्या संप करण्याची सांथच सुरू झाली आहे. जनतेच्याच सरकारनें मजुरांच्या जास्तींत जास्त हिताचे कायदे चालवले आहेत. तंटे मिटविण्याकरितां पंचपद्धतीचीं इंडस्ट्रियल कोर्टें स्थापन केलीं आहेत. त्यांना खुशाल धाब्यावर बसवून बेकायदा संप पुकारले जात आहेत.

संपाची कल्पना म्हणजे निषेध करून शांततेनें काम करण्याचें नाकारणें, असें साधारण जनता समजते. पण सध्यां जनतेला संपवाल्यांचे धोंडे खावे लागत आहेत. 'केशाचें' प्रायश्चित 'नाऱ्याला' दिलें जात आहे. यंत्रांची मोडतोड, इमारतींचें नुकसान आणि वरिष्ठांना मारहाण हे प्रकार सर्रास सुरू झाले आहेत, आणि याशिवाय रेशनिंग, रोगराई यांना तोंड देतां देतां नाकीं नव आलेल्या जनतेचा किती कोंडमारा व गैरसोय होते आहे हें वेगळें सांगणें नको. वास्तविक सर्वसाधारण जनता संपवाल्यांच्या बाजूची असते. पण सध्यां मजूर पुढाऱ्यांना जनमत काय आहे हें डोळे उघडून पहावयास सांगितलें पाहिजे. मागच्या पोस्टाच्या संपांत, मुंबईच्या ट्राम कंपनीच्या संपांत आणि ताज्या परळ रेल्वे वर्कशॉपच्या संपांत काय अनुभव आला आहे? जनता तर त्रासून संपवाल्यांना शाप देतेच आहे. पण इतकेंच नव्हे तर खुद्द मजुरांचेच सुबुद्ध पुढारी संपवाल्यांच्या बेताल वागणुकीमुळें हतबुद्ध होऊन गेल्याचा अनुभव येऊं लागला आहे. याचें उत्तम उदाहरण म्हणजे बकिंगहॅम कर्नाटिक मिलमधील मजुरांनीं तीन महिन्यांपर्यंत लांबविलेला संप. मागच्या ट्रामसंपाच्या वेळच्या कामकरी संघाच्याच अध्यक्षांचा–श्री.अबीदअली जाफरभाई ह्यांचा–राजीनामा आणि काल परवां जी. आय्. पी. परळ वर्कशॉपच्या संपाला उद्देशून भाई जयप्रकाश नारायण यांनीं केलेली कानउघाडणी यांनीं तरी आमचा मजूरवर्ग अजून जागा होईल काय?

देशाला आज जास्तींत जास्त उत्पादनाची गरज असतांना मजूरवर्गाचें जास्तींत जास्त सहकार्य आपल्या उद्योगधंद्यांना मिळावयास पाहिजे. संप करून तें वाढेल काय? काल परवां भाषण करतांना पं. नेहरूंनीं याच मुद्द्यावर जोर दिला आहे. संपामुळें उत्पादन घटून गरजेच्या जिनसा आणखी दुर्मिळ आणि महाग होतील हें कम्युनिस्ट पुढाऱ्यांना न कळण्याइतके ते निर्बुद्ध नाहींत. सोन्याचें अंडें घालणारी हंसी मारून टाकल्यानें ती आणखी अंडीं प्रसवेल काय? मालकवर्गाला कारखाने बंद करावयास भाग पाडून हेतु साध्य होणार आहेत काय? असा आमचा स्पष्ट सवाल आहे. जनतेबरोबर मजुरांचे कैवारी असलेले सरकारसुद्धां मजूरवर्गाच्या बेजबाबदार आणि बेकायदा बोकाळलेल्या वृत्तीला कंटाळलें आहे हें पुढाऱ्यांच्या लक्षांत येत नसावें असें दिसतें. सध्यांच्या हलाखीला केवळ मालकवर्गालाच जबाबदार धरणें ही चुकीची कारणमीमांसा आहे. मालकवर्गाचें वकीलपत्र येथें घेतलेलें नाहीं पण संपामुळें व संपवाल्यांच्या दांडगाईनें संत्रस्त झालेल्या जनतेच्या संतापाला वाचा फोडणें हें कठोर कर्तव्य मात्र बजावलेंच पाहिजे. पे कमिशनच्या शिफारशी मान्य नाहींत म्हणून आगगाडींतून जाणाऱ्या उतारूंवर दगडफेक करणें हा कोठला न्याय आणि जनतेनें ही दांडगाई काय म्हणून सहन करावी? तिच्याही सहनशीलतेला मर्यादा आहेच कीं नाहीं? जनतेच्या सहानुभूतीचा आतां प्रश्नच नाहीं. ती मजूरवर्ग केव्हांच गमावून बसला आहे.

मजूरवर्गाला आणखीहि एक धोक्याचा तांबडा कंदील दाखविणें जरूर आहे. देशांत बेकारी दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि जागतिक मंदीच्या सांवल्या पडूं लागल्या आहेत. पुढची उपासमारी टाळावयाची असेल तर आतांच सावधान होऊन आपल्या अवाच्या सवा मागण्यांना मवसणी घालून निर्वाहाचें साधन होणाऱ्या कारखान्यांना पुढच्या मंदींतून निभावून घेणें हें त्यांचें स्वहित–कर्तव्य आहे.

---

## हिंदी येण्याच्या तात्कालिक वसुलीच्या वाटाघाटी

एका बाजूस हिंदुस्थान सरकार आणि रिझर्व्ह बँक व दुसऱ्या बाजूस ब्रिटिश सरकार आणि बँक ऑफ इंग्लंड ह्यांचेमध्यें चालू वर्षाच्या प्रारंभीं हिंदुस्थानच्या ग्रेट ब्रिटनमधील येण्याच्या वसुलीबाबत हिंदुस्थानांत प्राथमिक वाटाघाटी झाल्या. एप्रिल अखेरचे सुमारास त्या पुनः पुढें चालू कराव्या असें तेव्हां ठरलें. परंतु जून अखेरपर्यंत बैठक होऊं शकली नाहीं. ३ जूनच्या घोषणेमुळें हिंदी राजकीय परिस्थिती एकदम पालटली आणि हिंदी येण्याच्या वसुलीबाबत अखेरचा करार करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यास तूर्त उभय पक्षासाहि सवड नाहीं. म्हणून, ग्रेट ब्रिटनमधील येण्याच्या वसुलीच्या तात्कालिक प्रमाणासंबंधीं योजना ठरवून त्याचा तपशील निश्चित करण्यापुरताच लंडनमधील आगामी बैठकीचा मर्यादित उद्देश आहे. हिंदुस्थानतर्फे, फडणिशी खात्याचे सेक्रेटरी श्री. व्ही. नरहरिराव व डेप्युटि सेक्रेटरी श्री. बी. के. नेहरू हे वाटाघाटींत हिंदुस्थान सरकारतर्फे भाग घेणार असून त्यांस रिझर्व्ह बँकेचा सल्लागार सहाय करणार आहे.

---

**दुष्काळ पीडितांना वृत्तपत्राची मदत**—चीनमधील क्वँटुंग प्रांतांत पडलेल्या ओल्या दुष्काळामुळें अन्नाला महाग झालेल्या लोकांसाठी हाँगकाँगमधील एका वृत्तपत्रानें आपल्या एका दिवसाच्या खपाचें उत्पन्न देण्याचें ठरविलें होतें. नियोजित दिवशीं मोहीम सुरू होतांच त्या वृत्तपत्राची पहिली प्रत २० हजार डॉलर्सला विकली गेली.

**युगोस्लाव्हियांत सार्वत्रिक माफी**—युगोस्लाव्हियांत अन्न टंचाई असतांना ज्या लोकांनीं सरकारला धान्याची वसुली न देतां धान्य दडवून ठेवलें, त्यांना शिक्षा करण्यांत आल्या होत्या. त्या लोकांची जप्त करण्यांत आलेली मालमत्ता त्यांना परत देण्याचें ठरलें आहे. ज्या लोकांनीं धान्य वसुलीला विरोध केला, त्यांना मात्र ही माफी मिळणार नाहीं.

**रशिआंत पावाचें वाटप संपणार**—पावाच्या कारखान्यांनीं आपली यंत्रसामुग्री अहोरात्र चालू ठेवण्याच्या दृष्टीनें तयारी ठेवावी असे हुकूम रशिआंतील पाव तयार करणाऱ्या कारखान्यांना देण्यांत आले आहेत. बहुधा येत्या सप्टेंबर महिन्यापर्यंत रशिआंतील पावाचें वाटप उठविण्यांत येईल, त्यासाठीं हे हुकूम देण्यांत आले असावे.

# श्री. नानासाहेब पुराणिक ह्यांचे अनुभव

## युरोप–अमेरिकेची औद्योगिक पहाणी

युरोप–अमेरिकेच्या युद्धकालीन औद्योगिक प्रगतीची पाहणी करण्याकरतां सर विश्वेश्वर अय्या यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या भारतीय कारखानदार शिष्टमंडळाचे सभासद व पनवेल येथील श्रीधूतपापेश्वर आयुर्वेदीय औषधी कारखान्याचे चालक श्रीमंत गंगाधर विष्णु ऊर्फ नानासाहेब पुराणिक यांचा सन्मान मराठा चेम्बर ऑफ कॉमर्स ॲण्ड इण्डस्ट्रीजतर्फे केसरी मराठा संस्थेच्या सभागृहांत श्री. शंकरराव किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

### यंत्रशक्तीचा उपयोग

त्या वेळीं श्री. पुराणिक ह्यांनीं आपल्या भाषणांत निरनिराळ्या देशांच्या औद्योगिक प्रगतीचीं मनोरंजक व उद्बोधक उदाहरणें सांगितलीं. ते म्हणाले, " आपला देश शेतीप्रधान आहे, असें आपण म्हणतों. परंतु हा धंदाहि उत्पादनाच्या दृष्टीनें पाश्चिमात्य देशांशीं तुलना करतां अगदीं खालावल्याचें आमच्या प्रत्ययास आलें. आपल्या शेतकीच्या धंद्याला यंत्रसहाय्य केल्याविना व अधिक खत दिल्याविना दर एकरीं उत्पादन वाढणार नाहीं. आपण गोपूजक आहों, परंतु आपल्यापेक्षां गोजीवनाकडे पाश्चिमात्य लोक अधिक आपुलकीनें पाहतात. यामुळें गोरसाची लयलूट पाश्चिमात्य देशांत आहे. यंत्रशक्तीचा उपयोग जितका शेतीच्या उत्पादनवाढीकरतां केला पाहिजे त्यापेक्षाहि अधिक यंत्रशक्तीचा उपयोग औद्योगिक उत्पादनाकरतां करावयास हवा. आपलें दर माणशीं उत्पादन वाढल्याविना जीवनाचा दर्जा वाढणार नाहीं व यंत्रशक्तीच्या सहाय्याविना दर माणशीं उत्पादन वाढणार नाहीं.

### अमेरिका व स्वित्सरलंड

" युनायटेड स्टेट्सचा प्रयत्न जगांत आघाडीवर रहाण्याचा आहे. युद्धपूर्व कालापेक्षां आज त्याचें युद्धोत्तर उत्पादन तिप्पट व निर्गत सातपट झाली आहे. सर्वच बाबतींत तो देश पुढें आहे. युनायटेड स्टेट्स पुढें आहे म्हणजे इतर देश स्वस्थ आहेत असेंहि नव्हे. स्वित्सरलंड हा फारच लहान देश आहे. त्याच्याजवळ ना कच्चा माल ना यंत्रशक्तीच्या पुरवठ्याचा कोळसा, ना खनिज तेलासारखीं साधनें. परंतु इतकें असूनहि तें आज फारच पुढारलेलें औद्योगिक राष्ट्र आहे. बरें या देशांत उत्पादनाचे सर्वच घटक मोठे आहेत असेंहि नव्हे. तेथें मध्यम व लहान प्रमाणावरहि धंदे व व्यापार ही चालतात. या लहान व छोट्या धंद्यांना आवश्यक ती माहिती व सहाय्य देण्याची तेथें संघटित व्यवस्था आहे.

### सर विश्वेश्वर अय्यांचा आदर्श

"सर विश्वेश्वर अय्या हे वयाच्या ८७व्या वर्षी औद्योगीकरणाच्या तळमळीनें या एवढ्या दूरच्या दौऱ्यावर गेले. त्यांच्याबद्दल सर्वत्रच आदर असल्यामुळें व त्यांना आंतरराष्ट्रीय मानमान्यता असल्यामुळें आमचा दौरा विशेषच यशस्वी झाला. सर विश्वेश्वर अय्या कधीं आजारी पडले नाहींत. या दौऱ्यांतील कार्यक्रमाची वेळहि मिनिटानेंहि त्यांनीं कधीं चुकविली नाहीं. इतरांची कधीं ना कधीं चुकली असेल. आमच्या शिष्टमंडळाच्या पाहणीचा अहवाल तयार होत आहे व तो राष्ट्राला मार्गदर्शक व्हावा अशी सर विश्वेश्वर अय्यांची खटपट आहे. सर विश्वेश्वर अय्या पूर्वी म्हणत, कीं राजकारणाच्या खालोखाल औद्योगीकरणाला महत्त्व आहे. परंतु आतां स्वराज्य मिळाल्यानें औद्योगीकरण हेंच आज महत्त्वाचें आहे असें ते म्हणतील. आतां आपल्याला आपला देश संपन्न करावयाचा आहे व संरक्षणक्षम करावयाचा आहे. तें काम औद्योगीकरणानेंच साधणार आहे. "


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,०५,५४५
खेळतें भांडवल रु. ६१,००,०००

मुंबई शाखा:—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "
श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

आरको
प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४.

तयार कपड्यांचे व्यापारी
महिंद्रकर ब्रदर्स
गिरगांव, मुंबई नं. ४
व बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.